महासागर
शुक्रवार दि.१० जानेवारी २०२५
खामगाव (बुलडाणा)
पान ६

# श्री रेणुका माता संस्थान जनुना येथे ११ हजार दिव्यांचा दीपोत्सव



**खामगाव** : श्री रेणुका माता यांच्या कृपा आशिर्वादाने मागिल वर्षी प्रमाणे यंदाही शनिवार ११ जानेवारी रोजी दु. ५ ते ७ या वेळेत श्री. रेणुका माता संस्थान जनुना येथे भव्य दिपोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. अयोध्या राम मंदीर स्थापना दिवस म्हणुन संस्थानने दरवर्षी ह्या तिथीला दिपोत्सव साजरा करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार हा दीपोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यावेळी भाविकांनी आपल्या । सोईनुसार मातीचे दिवे (पणती). आणण्यास हरकत नाही. रांगोळी व दिप लावण्याच्या कार्यात मदत म्हणुन भाविकांनी सहभागी व्हावे, संस्थान तर्फे ११,००० दिप लावण्याचा मानस आहे. तरी परिसरातील भाविकांनी उत्सव दर्शन व प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रेणुका माता मंदिर संस्थान तथा समस्त विश्वस्त मंडळ जनुना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवशाही बसला अपघात : १७ जखमी

**खामगावः** छत्रपती संभाजी नगर येथून अकोलाकडे प्रवासी घेवून जाणारी शिवशाही बस (क्र. एमएच ०९ ईव्ही- ९९७३) ८ जानेवारी २५ रोजी दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास शहराकडे येत होती. दरम्यान गारडगाव शिवारात अचानक भरधाव ट्रॅक्टर समोर आल्याने चालकाने बसवरील नियंत्रण सुटले व बस रस्त्याच्या कडेला घसरली. या अपघातात १७ जण जखमी झाले. घटनेवेळी उपस्थित नागरिकांनी प्रवाशांना बस बाहेर काढले व जखमींना सामान्य रुग्णालयात दाखल केले. जखमींपैकी वैशाली वाकोडे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना नातेवाईकांनी खाजगी रुग्णालयात नेले. जखमी प्रवाशांना एसटी महामंडळाकडून आर्थिक मदत देण्यात आली. या प्रकरणी बसचालक भारत रोहिदास कांदे यांनी खामगाव ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरूध्द कलम २८१, १२५ (ए). ३२४ (४) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोहेकॉ भगवान काळवाघे करीत आहेत.

# गोतस्करी,गोहत्या बंदीसाठी युवा हिंदू प्रतिष्ठाण तर्फे निषेध मोर्चा

**खामगाव (का.प्र.)**: शहरासह तालुक्यात सातत्याने सुरू असलेली गौतस्करी बंद करण्यात यावी.यासाठी युवा हिंदू प्रतिष्ठाण आणि सकल हिंदूंतर्फे आज ९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता येथील विकमसी चौक,कृषी उत्पन्न बाजार समिती येथून निषेध मोर्चा काढण्यात आला होता.

सदर मोर्चा येथील विकमसी चौक,कृषी उत्पन्न बाजार समिती समोरून टिळक पुतळा, नगर परिषद,रेल्वे स्टेशन ,खामगाव शहर पोलीस स्टेशन समोरून टॉवर चौक येथे येऊन उपविभागीय अधिकारी, खामगाव यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री/गृहमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.दरम्यान मार्गातील लोकमान्य टिळक, भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तसेच महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,भारतीय घटना अनुच्छेद ४८ नुसार भारतात



घटनेने प्रत्येक राज्याला गौधन, कृषी पशुधन यांच्या संरक्षणचे अधिकार दिलेले आहेत. त्याचावर महाराष्ट्रात गौहत्या बंदी कायदा २०१४ सुद्धा लागू आहे, परंतु या कायदाचे रोज उलंघन करून गौतस्कर गौहत्या करीत असल्याचा आरोप करण्यात आला. तसेच गेल्या १-२ वर्षात खामगाव तालुक्यात गावो-गावी चोरींच्या वाहने घेऊन गाईना जबरदस्तीने कोंबून- कोंबून भरून नेल्या जात आहेत, खामगाव शहरात सुद्धा कायदा हातात घेऊन गौतस्कर गौमातेला कापण्यासाठी नेत आहेत. आता तर कायदा धाब्यावर बसवून लोकांच्या खुटयावर बाधलेली गौवंश चोरून नेत आहे. या सर्व प्रकारच्या घटनांना बघता हिंदू समाजामध्ये रोष उत्पन्न होत आहे. गौमाता सनातन हिंदू धर्मात पूजनीय असून त्याची जर रोज अश्या पद्धतीने कत्तली होत असतील तर सामाजिक रोष उत्पन्न होण्याची संभावना नाकारता येत नाही. तर गौरक्षक रस्त्यावर उतरून गौतस्कारी थांबवण्याचे प्रयत्न करतो तर त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना तुरंगात टाकण्यात येत असल्याचा आरोप सुद्धा करण्यात आला आहे.

तसेच गौरक्षकांना सुद्धा संरक्षण मिळाले पाहिजे. तसेच तालुक्यात सुरू असलेली गौतस्करी बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. निषेध मोर्चात जनम जनम का नाता हैं, गाय हमारी माता हैं.गोतस्करी बंद करो, बंद करो सह घोषणा देण्यात आल्या.

यावेळी विविध हिंदू संघटनेच्या पदाधिकारी यांनी आपले विचार व्यक्त केले. मोर्चात शेकडो हिंदू धर्मप्रेमी, गोभक्त धर्मबांधव मोठया संख्येने उपस्तित होते. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकातून देण्यात आली आहे.

# जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने रक्तदान महायज्ञ

**खामगाव** : जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही ११ जानेवारी २५ रोजी सामान्य रुग्णालय येथे रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. सिकलसेल, ऍनिमिया, हिमोफिलिया, थैलीसीमिया, ब्लड कॅन्सर, किडनी फेल्युअर रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत आवश्यकता असते. यासाठी शासनाच्या रक्तपेढ्यांना रक्त उपलब्ध करून देण्याचे संप्रदायामार्फत निश्चित केले आहे. तरी रक्तदात्यांनी या सामाजिक कार्यात सहभागी होऊन सहकार्य करावे तसेच नाव नोंदणीसाठी मो.नं. ९०११२६५१७५, ९८८११७५५१३, ९८८१३३०८४५, ९०९६८५६९४९. ९५५२३७००२३ ९२८४९२६६२८ यावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# टुनकी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सौ.सीमाताई राजेंद्र वानखडे अविरोध



**सोनाळा (महासागर प्रतिनिधी)** : तालुक्यातील टुनकी ग्रामपंचायतीवर राजेंद्र वानखडे यांची एकहाती सत्ता आहे. १३ सदस्य संख्या असलेल्या या ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. वंदना गायकवाड यांनी आपसात ठरल्याप्रमाणे सरपंच पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी सोमवारी दि.६ जानेवारी रोजी ग्रामपंचायत टुनकी कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी सौ.सीमा राजेंद्र वानखडे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी चामलाटे यांनी सौ. सीमा राजेंद्र वानखडे यांची बिनविरोध निवड जाहीर केली. टुनकी गावच्या सरपंच झालेल्या सीमाताई वानखडे ह्या संग्रामपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तसेच माजी सरपंच असलेले राजेंद्र वानखडे यांच्या पत्नी आहेत. सौ.सीमाताई यांचे सासरे आर.एल.वानखडे हे देखील टुनकी सरपंच होते. त्यामुळे इतिहासात मागासवर्गीय कुटुंबातून एकच परिवारात तीन वेळा सर्वसाधारण जागेवर सरपंच होण्याचा मान टुनकीच्या वानखडे कुटुंबांनी मिळविला आहे.

# उद्या खामगावात बुलढाणा जिल्हा कुस्ती संघाची निवड चाचणी स्पर्धा



**खामगाव** : महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद पुणे यांच्या मान्यतेने तसेच विदर्भ कुस्तीगीर संघटना नागपुर यांच्या मान्यतेने ६६ वी वरीष्ठ गट गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत स्पर्धा, कुमार राज्य अजिंक्य पद कुस्ती स्पर्धा, वरीष्ठ महिला राज्य अजिंक्य पद स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताबाची लढत,वरीष्ठ ग्रीन रोमन राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असुन लवकरच या स्पर्धेच्या तारखा सुध्दा जाहिर होणार आहे. या स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरीता बुलढाणा जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने शनिवार दि.११ जानेवारी २०२५ रोजी खामगाव येथील श्री शिवाजी व्यायाम मंदिर येथे सकाळी ९ वाजता बुलढाणा जिल्हा कुस्तीगीर संघाची निवड चाचणी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष विदर्भ कुस्तीगीर संघटना नागपुर व बुलढाणा जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष, शक्तीउपासक राणा गोकुलसिंह सानंदा हे राहणार असुन निवड चाचणी स्पर्धेला प्रमुख उपस्थिती म्हणुन माजी आमदार दिलीपकुमार सानंदा,शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त बाबुजी थानवी,विदर्भ कुस्तीगीर संघटनेचे सचिव गणेशजी कोहळे,विदर्भ हौशी कबड्डी असो.चे सचिव अशोकबाप्पु देशमुख,माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा, खामगाव शहर कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने,खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुभाष पेसोडे यांच्यासह आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या निवड चाचणी स्पर्धेमर्ध्ये पुरुष गट गादी विभाग करीता वजन गट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२, ९७ व केसरी गट पुरुष गट माती विभागाकरीता वजन गट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२ ,९७ हे राहणार आहे.

# चौकातील समस्यांवर एकच उपाय, भुयारी मार्ग त्वरीत पुर्ण करा- अरूण चांडक



**शेगाव (महासागर प्रतिनिधी)** येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक हा एकमात्र मुख्य चौक आहे. या चौकात नगरातील प्रत्येक नागरीक व नगरात येणारी व्यक्ती आणि वाहनास या चौकातूच जावे लागते. त्यामुळे यावर सतत वळद्र राहते. नगरात प्रवेश करतांना चारही बाजुने येणारे रस्ते शिवाजी चौकतात मिळतात. वरिल चौक पास करण्यास जवळपास अर्धा तास लागतो. ही समस्या सोडविण्यास कोणतेच अधिकारी लक्ष देत नाही. तसेच विकास आराखड्यात विचार झालेला दिसत नाही. त्यामुळे चौक सतत जाम होते. ही दिवसेन दिवस समस्या वाढतच आहे. शिवाजी चौकाचा अभ्यास केल्यास नगरात येणारे प्रत्येक लहान मोठे वाहने याच चौकातूनच जाणे येणे करावे लागते. या चौका लगतच मुख्य बाजार पेठ आहे. या अर्धा मिलोमीटर रोडवर रेल्वे स्टेशन, बॅकां, पेट्रोपंप, कृउबास आहे. तेल्हारा, वरवट, संग्रामपुर व शेगांव ग्रामीण भागातील लोकांना उडापुलावरून शिवाजी चौकातून वरील स्थानकावर लावे लागते. शेगांव येथील १ व २ प्रभाग मधील नागरीकांना गावात येण्याकरीता उडाण पुलाचाच वापर करावा लागतो. ही संपुर्ण वाहतुक शिवाजी चौकातून जाते. वरवट रोडवर ३ विद्यालय/महाविद्यालय आहे. यात हजारो विध्यार्थी शिक्षण घेतात. यांना जाण्याकरीता एकमात्र रस्ता आहे तो म्हणजे शिवाजी चौकातील उड्डान पुलच.चौकातून अंदाजे दररोज एक ते दिड लाख नागरीक, १० हजार दोन चाकी, तिन चाकीवाहने, एक हजारा पर्यंत चार चाकी वाहनाची वाहतूक असते.

**भुयारी मार्गाचा प्रभावी उपाय** - विकास आराखडया या कडे भुयारीमार्गा कडे दुरलक्ष झाले किंवा या गोष्टीचा विचार केला नसावा. रेल्वे लाईन पलीकडील नागरीकांनी येणारी अडचण ओळखुन मागील १०-१२ वर्षा पासुन भुयारीमार्गाची मागणी केली, आंदोलने केली, शेकडो निवेदन दिली. पण याकडे विकास आराखड्यातील अधिकारी यांनी दुरलक्ष केले. अखेर आ. डॉ. संजय कुटे यांनी भुयारी मार्गाची गरज पाहता व येण-या अडचणी ओळखुन भुयारी मार्गाला लागणारा निधी व शासकिय अधिका-याकडून येणा-या अडचणी सोडविल्या, निवडणुक पुर्वी भुमीपुज करून मार्ग मोकळा केला. आताही भुयारी मार्गाचे काम मंद गतीने सुरू आहे. भुयारी मार्ग सुरू झाल्यास शाळेतील विध्यार्थी, रेल्वे पलीकडील १५ हजार नागरीक, संत गजानन महाराजच्या दर्शनासाठी आकोट, तेल्हारा, वरवट बकाल कडील हजारो नागरीकांना शिवाजी चौकात न जाता भुयारी मार्गाने सरळ मंदीराच्या वाहन तळावर तसेच गांधी चौकात जाता येईल. त्यामुळे शिवाजी चौकातील ट्राफीक कमी होईल. तरी मा. जिल्हाधिकारी, विकास आराखडयातील अधिकारी, मुख्याधिकारी, वाहतुक नियंत्रण् ठेवणारे पोलीस अधिकारी जर भुयारी मार्गच्या निर्मितीला गती कडे लक्ष दिल्यास शिवाजी चौकातील होणारा जाम कमी होईल. तसेच रेल्वे पलीकडील नागरीकांना सुविधा होईल.

# राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन

**खामगाव (का.प्र.)** : अखिल भारतीय मराठा महासंघ क्रीडा शैक्षणिक व सांस्कृतिक विभाग खामगाव द्वारा आयोजित राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव निमित्त १२ जानेवारी रविवार रोजी दुपारी ४ वा श्री छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम शिवाजी नगर येथे भव्य निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे.

निबंध स्पर्धा विषय राष्ट्रमाता जिजाऊ यांनी कसे घडविले शिवबा या विषयावर राहील. या स्पर्धे मध्ये प्रथम बक्षीस २१०० रू अ गट माजी नगराध्यक्ष गणेशभाऊ माने , द्वितीय अ गट १५००रू समाज सेवक महेंद्र मावळे, तृतीय अ गट १००० रू माजी कोषाध्यक्ष मराठा महासंघ सुभाष शेळके,तसेच ब गट प्रथम बक्षीस १५००रू मा अध्यक्ष हनुमान नवयुवक मंडळ रामभाऊ बोन्द्रे,द्वितिय ब गट १००० रू सचिव स ए महाराज वाचनालय संजय नळकांडे, तृतिय ब गट ७५० रू,मा उपाध्यक्ष हनुमान नवयुवक मंडळ महेंद्र पाठक यांच्या वतीने देण्यात येतील निबंध स्पर्धेत अ गट वर्ग ७ ते वर्ग १० ब गट वर्ग ४ ते वर्ग ६ पर्यंत चे विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात स्पर्धेत सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देण्यात येईल तरी खामगाव शहरातील व परिसरातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा तसेच नोंदणी साठी व अधिक माहितीसाठी सद्गुरू एकनाथ महाराज सार्वजनिक वाचनालय शिवाजी नगर या ठिकाणी मोनं ९९७५९२५३२५ मुन्ना बोन्द्रे, ९८३४०७७२५० सचिन कापले, ७३५००२४५५९ निखिल काळे, ९७६३९८४९७४ सागर मोरे, ८३०८२४००१६ वैभव पवार, ९९७५८४६२७१ विशाल भवर, ९६६५१३८६३३ देविदास शर्मा, ९९२२८०९९२५ नागोराव अवतार, ७३५०८७६२९८ अमोल पवार, ८१८०९०५९२० विशाल रेठेकर, ७०२०९५१७३१ विशाल घोडके, ८३९०९१८१४५ सौ मिना मापारी, ८४५९३४२२०२ सौ मोनिका काटकर याच्याशी संपर्क करावा तसेच जिजाऊ जन्मोत्सव निमित्त मोफत इंग्लिश स्पिकींग कोर्स क्लासेस सुरू करण्यात येणार आहे तरी विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान मराठा महासंघ जिल्हा अध्यक्ष क्रीडा विभाग वकास चव्हाण, आकाश खरपाडे यांनी केले आहे, अशी माहिती देविदास शर्मा यांनी दिली आहे.

# राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रमाचे आयोजन

**खामगाव**- स्थानीक सद्गुरू श्री आगाशे काका शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमीत्य १२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान होणार आहे. तसेच तरुणांना रोजगार विषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी शहर व परिसरातील नागरिक व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य एस. डी. गंगावणे यांनी केले आहे.

# अभाविपच्या प्रांत अधिवेशनात युवकांनी सहभागी व्हावे- गणेश घोराळे

**खामगाव (का.प्र.)** : स्थानिक अभाविप च्या छात्रशक्ति सदन या कार्यालयात अभाविपचे जिल्हा प्रमुख गणेश घोराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत अभाविप ची बैठक पार पडली. या बैठकीत डॉ हेडगेवार स्मृती परिसर,नागपूर येथे २८ ते ३० जानेवारी २०२५ ला संपन्न होणाऱ्या ५३ व्या प्रांत अधिवेशनात जास्तीत जास्त युवकांनी सहभागी व्हावे असे आवाहन अभाविप चे जिल्हा प्रमुख गणेश घोराळे यांनी केले.यावेळी गणेश घोराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिवेशन पोस्टर चे विमोचन करण्यात आले.




या प्रसंगी जिल्हा संयोजक ऋषिकेश वाघमारे, जिल्हा सह संयोजक सानिका राठोड,जिल्हा संगठनमंत्री महेश वाघमारे,नगरमंत्री गणेश कठाळे, एस एफ एस प्रमूख शुभम राठोड, जिल्हा सोशल मीडिया प्रमुख सुयोग चंद्रे, आयटीआय अध्यक्ष ओम काळे, अभाविप चे सदस्य हरीश राउत, वेदांत भोजने आदी प्रमूख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# राष्ट्रमाता जिजाऊ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त शाहीन पटेल यांचा वाढदिवस साजरा

**सुलतानपूर (महासागर प्रतिनिधी)** - ७ जानेवारी रोजी खाजा गरीब नवाज यांच्या जयंतीदिनी सुलतानपूर येथील समाजसेविका विदर्भ कन्या शहीद पटेल यांचा जन्म झाल्या असल्यामुळे शाईन पटेल यांचा सुद्धा याच पावन दिवशी जन्म झालेला आहे. सविस्तर वृत्त असे की सुलतानपूर येथील विदर्भ कन्या शाहीन पटेल यांचा ७ जानेवारी ख्वाजा गरीब नवाज यांच्या जयंती दिवशी जन्म झालेला असल्यामुळे हा दिवस इस्लाम धर्मामध्ये पावन दिवस म्हणून साजरा करण्यात येतो त्याच अनुषंगाने वाहिनी पटेल यांचा विविध ठिकाणी सुलतानपूर या ठिकाणी मोठ्या आनंदोत्सवामध्ये वाढदिवस साजरा करण्यात आला.



शाईन पटेल यांनी विविध सामाजिक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केल्यामुळे सुलतानपूर या ठिकाणी शाहिन बिछायत केंद्र सुलतानपूर या ठिकाणी फार मोठ्या संख्येने त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला तसेच नव्याने सुलतानपूर या ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविलेला आहे या ठिकाणी सुद्धा गावातील अण्णाभाऊ साठे स्मारक समिती समाज बांधवांच्या वतीने वाढदिवस साजरा करण्यात आला राष्ट्रमाता जिजाऊ, वूमन आयकॉन अवॉर्ड, तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे समाजभूषण, संविधान गौरव राज्यस्तरीय पुरस्कार, अशा सर्वच राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केल्या गेल्या आहेत, म्हणून सुलतानपूर या ठिकाणी समाज बांधवांच्या वतीने त्यांचा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी दैनिक पब्लिक मंथनचे मुख्य संपादक लूकमान कुरेशी, श्री सिद्धेश्वर विद्यालयाची प्राचार्य गजानन धांडे सर, कलाशिक्षक गोपाल वाकोडे सर, डॉक्टर जयकुमार देसाई, डॉक्टर परसराम मामा सुरूसे, पत्रकार भाई सुरेश मोरे, उबेद कुरेशी,डॉक्टर दीपक गारडे,भराड सर, डॉक्टर कीर्ती कुमार कांबळे अमोल अवचार पत्रकार शेख वसीम, राजेश अवचार , विनोद अंभोरे, पांडुरंग सुरूसे, मंगेश खेत्रे राजेश दानवे , वसीम पैहेलवान, ऋषिकेश मुळे, शेख अब्रार पठाण, अशोक अवचार, सुदर्शन अवचार , सुभाष पाटोळे आत्माराम दानवे, दामू कुडके अशोक घोडे राजेश अंभोरे तानाजी अवचार गोविंद अवचार श्रावण अवचार बबन गायकवाड तानाजी अवसार विठ्ठल आवारे छायाताई कुडके चंद्रकांता ताई मुळे रंजनाताई कडूकर इत्यादी अशा अनेक मान्यवरांनी या ठिकाणी उपस्थित राहून शाहीन पटेल यांचा शाहीन पटेल यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसानिमित्त मान सन्मान केला. या ठिकाणी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार भाई सुरेश मोरे तसेच डॉक्टर कीर्ती कुमार कांबळे यांनी केले या कार्यक्रमाचे आयोजन मोईन पठाण, अविनाश कांबळे प्रेम कुडके राजेश अवचार विनोद अंभोरे यांनी उत्साह पूर्ण मोठ्या थाटामाटात केले होते

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर कोर्ट संग्रामपूर**
यांचे न्यायालय

एम.जे.सी. नं. १७४/२०२४
दाःता. १०./०२/२०२५
अर्जदारा तर्फे ॲड बी.पी. खंडेराव, संग्रामपुर
अर्जदार :-१) मिराबाई पन्नालाल जामुनकर, वय अं. ४१ वर्षे, व्यवसाय गृहिणी रा. चुनखेडी ता. संग्रामपुर जि. बुलडाणा. २) प्रमिला जियाउल्ला शेख, वय अं. ३८ वर्षे, व्यवसाय गृहिणी, रा. हनुमान मंदिर पेठ जामोद ता. जळगांव जामोद जि. बुलडाणा
गैरअर्जदार -विरुध्द- कोणीही नाही.

या जाहीर नोटीसव्दारे सर्वत्रा लोकांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणातील मयत सखाराम आंधळा मावस्कार रा. सालवन ता. संग्रामपुर जि. बुलढाणा येथील रहिवासी होते व ते दिनांक २९/०९/२०२० रोजी मौजे सालवन ता. संग्रामपुर जि. बुलढाणा येथे मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र. १ व २ हया मुली आहेत. मयत सखाराम आंधळा मावस्कार हे मयत झाल्यानंतर त्यांच्या मागे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जदार यांनी वि. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी वरिल अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जा संबधात ज्या कोणास काही हरकत घेणे असेल, त्यांनी चौकशी तारीख १०/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. पावेतो या न्यायालयात अथवा स्वत: अथवा वकिलामार्फत हजर होउन त्याची हरकत सादर करावी. अन्यथा कुणाची काहीही हरकत नाही असे समजुन वारस प्रमाणपत्र देणेबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस सहिनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी आज दिनांक ०७/०१/२०२४ रोजी दिली.

(शिक्का)
आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कोर्ट
संग्रामपूर जि.बुलडाणा

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर कोर्ट संग्रामपूर**
यांचे न्यायालय

एम.जे.सी.नं. १७२/२०२४
दा.ता. १०/०२/२०२५
अर्जदारा तर्फे ॲड बी.पी. खंडेराव, संग्रामपुर
अर्जदार :- १) हेजाबाई केडया दारसिमा, वय अं. ७९ वर्षे, व्यवसाय गृहिणी २) नानकराम केडया दारसिमा, वय अं. ५५ वर्षे, व्यवसाय मजुरी ३) चंपाबाई माणिकरम दारसिमा, वय अं. ५० वर्षे, व्यवसाय गृहिणी ४) शामलाल ऊर्फ साबुलाल माणिकरम दारसिमा वय अं. ३० वर्षे, व्यवसाय मजुरी ५) मिनाबाई माणिकराम दारसिमा, वय अं. २२ वर्षे, व्यवसाय गृहिणी सर्व रा. रा. चुनखेडी ता. संग्रामपुर जि. बुलडाणा ह.मु. रोहिणखिडकी ता. संग्रामपुर जि. बुलडाणा
-विरुध्द- गैरअर्जदार- कोणीही नाही.

या जाहीर नोटीसव्दारे सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणातील मयत केडया डेडु दारसिमा हे रा. रोहिणखिडकी ता. संग्रामपुर जि. बुलढाणा येथील रहिवासी होते व ते दिनांक २६/०५/२०२४ रोजी मौजे रोहिणखिडकी ता. संग्रामपुर जि. बुलढाणा येथे मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र. १ ही पत्नी असुन अर्जदार क्र. २ व माणिकरम हे मुले आहेत, त्यातील माणिकरम केड्या दारसिमा हे दिनांक २१/०१/२०२४ रोजी मौजे रोहिणखिडकी ता. संग्रामपुर जि. बुलडाणा येथे मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र. ३ ही पत्नी व अर्जदार क्र. ४ हा मुलगा आहे. म्हणजेच अर्जदार क्र. ३ ही मयताची सुन व अर्जदार क्र. ४ हा नातु आहे व अर्जदार क्र. ५ ही नात आहे. मयत केडया डेडु दारसिमा हे मयत झाल्यानंतर त्यांच्या मागे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जदार यांनी वि. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी वरिल अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जा संबधात ज्या कोणास काही हरकत घेणे असेल, त्यांनी चौकशी तारीख १०/२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. पावेतो या न्यायालयात अथवा स्वतः अथवा वकिलामार्फत हजर होऊन त्याची हरकत सादर करावी. अन्यथा कुणाची काहीही हरकत नाही असे समजुन वारस प्रमाणपत्र देणेबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस सहिनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी आज दिनांक ०७/०१/२०२५ रोजी दिली.

(शिक्का)
आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कोर्ट
संग्रामपूर जि.बुलडाणा

नियमित वाचा
महासागर
बातम्या व जाहिरातींसाठी संपर्क
9561361404

RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव[बुलढाणा] मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलडाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

